सोलापूर महानगरपालिका,

मनपा लोगो

जा.क्र.नआ/वै./२९९
आयुक्त कार्यालय
सोलापूर दि. ३०/०५/२०२०

-: जाहिर प्रसिध्दीकरण :-

सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत आरोग्य विभागाकडे विषाणू संशोधन आणि निदान प्रयोगशाळा (Viral Research & Diagnostic Laboratory (VRDL) विभागाकरीता खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने १ (एक) वर्षाकरीता मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | भरावयाची पद संख्या | इतर बाबी | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Research Scientist-2 (Medical) | MD microbiology | 2 | 1) Knowledge of computer application or business intelligence tools/data management is preferred.<br>2) Training of virology or molecular techniques obtained will be preferred | Rs.60,000/- |
| 2 | Laboratory Technician | B.Sc. DMLT | 4 | 1) Preference to the candidate having 5 years of experience in Microbiology work<br>2) Knowledge of computer application or business intelligence tools/data management.<br>3) Traning of virology or molecular techniques obtained will be preferred. | Rs.20,000/- |
| 3 | Peon | S.S.C. pass | 3 | Preference to the candidate having 5 years of experience in Laboratory help work | Rs.15,000/- |

१) सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत विषाणू संशोधन आणि निदान प्रयोगशाळा (Viral Research & Diagnostic Laboratory (VRDL) विभागाकडे कामकाज करणे बंधनकारक असेल

२) इच्छुक उमेदवारांनी दि.३०/०५/२०२० ते ०४/०६/२०२० रोजी सांय.०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या smcgados2@gmail.com या ई-मेल वरच अर्ज सादर करावा. अर्जासोबत i) वयाचा पुरावा ii) पदास आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका iii) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) iv) शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) v) निवासी पुरावा vi) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यासह एकाच PDF फाईलमध्ये ई-मेल वर सादर करावा. प्रत्यक्ष अर्ज दयावयाचे असल्यास, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील.

३) सदर पदासाठीच्या अर्जाचा नमुना www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थावर Recruitment Notices यामधून download करावा.

४) वयोमर्यादा :- अ.क्र.१ चे पदाकरीता कमाल वयोमर्यादा ५० पेक्षा अधिक नसावी.
अ.क्र.२ व ४ करीता कमाल वयोमर्यादा ४३ पेक्षा अधिक नसावी.

५) सदरची जाहिरात तसेच अन्य शर्थी व अटी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत.

(पी शिवशंकर, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

Scanned with Can

अटी व शर्ती :-

१) सदर सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत आरोग्य विभागाकडे विषाणू संशोधन आणि निदान प्रयोगशाळा (Viral Research & Diagnostic Laboratory (VRDL) विभागाकडे कामकाज करणे बंधनकारक असेल

२) इच्छुक उमेदवारांनी दि.३०/०५/२०२० ते ०४/०६/२०२० रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या smcgados2@gmail.com या ई-मेल वरच अर्ज सादर करावा. प्रत्यक्ष अर्ज दयावयाचे असल्यास, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील.

३) सदर पदासाठीच्या अर्जाचा नमुना www.solapurcorporation.gov.in यामध्ये Recruitment Notices यामधून download करावा.

४) उमेदवाराने सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये पदाचे नांव स्पष्ट नमूद करावे. तसेच खाडाखोड अथवा अवाचनिय अर्ज सादर करु नये अन्यथा संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

५) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

६) सदरची पदे तात्पुरत्या स्वरुपात असून, करार पध्दतीने एक वर्षाच्या कालावधीकरीता भरण्यात येणार आहेत.

७) पदासमोर नमूद प्रमाणे मानधन असुन, त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

८) प्राप्त अर्जातील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण, उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे गुणाची एकत्रित बेरीज करुन एकूण गुणाच्या आधारे मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल.

९) मेरिट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.solapurcorporation.gov.in या वेबसाईट वर दि.०६/०६/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येईल,

१०) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११) शासकीय सेवेत नियमित सामावून घेणेबाबत किंवा शासनामा

१२) र्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१३) नियुक्ती दिलेल्या उमेदारांनी सोलापूर मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१४) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा.

१५) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्यांची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१६) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार तसेच पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इ. सर्व अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

(पी शिवशंकर, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

Scanned with Can